17 FEB 2017

पुढारी

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# शिक्षकांनी अद्ययावत ज्ञान आत्मसात करण्याची गरज

## परीक्षा नियंत्रक महेश काकडे; शिक्षणशास्त्र अधिविभाग, परीक्षा विभागातर्फे राष्ट्रीय परिसंवाद

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

नव्या तंत्रज्ञानाच्या युगातील विद्यार्थी शिक्षणाबद्दल खूप जागरूक आहेत. त्यांना घडविण्यासाठी शिक्षकांना अद्ययावत तंत्रज्ञानाचे ज्ञान असणे काळाची गरज बनली आहे, असे प्रतिपादन परीक्षा नियंत्रक महेश काकडे यांनी केले.

शिवाजी विद्यापीठ शिक्षणाशास्त्र अधिविभाग व परीक्षा विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने मानव्यशास्त्र सभागृहात आयोजित 'उच्च शिक्षणातील परीक्षा सुधार' या विषयावर दोन दिवसीय राष्ट्रीय परिसंवादाच्या उद्‌घाटनप्रसंगी ते बोलत होते. अध्यक्षस्थानी कुलसचिव डॉ.विलास नांदवडेकर होते. परीक्षा नियंत्रक काकडे म्हणाले, 'संशोधन, संस्कारकेंद्रित समाज घडविण्याची जबाबदारी शिक्षकांवर असून त्यासाठी शिक्षण पूरक व्यवस्था निर्माण होणे आवश्यक आहे. चांगले शिक्षक विद्यार्थ्यांमध्ये सकारात्मक ऊर्जा प्रस्तूत करीत असतात. उच्च शिक्षणातील परीक्षा पद्धतींमध्ये राज्यात एकसारखेपणा आणण्यासाठी एकत्रित प्रयत्नांची गरज आहे. परीक्षा प्रणालीमध्ये अद्ययावत तंत्रज्ञानाचा स्वीकार करण्यासाठी सर्व घटकांनी सकारात्मकता दाखविली पाहिजे.




**कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठात आयोजित 'उच्च शिक्षणातील परीक्षा सुधार' या विषयावर दोन दिवसीय राष्ट्रीय परिसंवादाच्या उद्‌घाटनप्रसंगी बोलताना परीक्षा नियंत्रक महेश काकडे. सोबत कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर, डॉ. पी. एस. पाटणकर आदी. (छाया : पप्पू आतार)**

अध्यक्षस्थानावरून बोलताना कुलसचिव डॉ. नांदवडेकर म्हणाले, 'उच्च शिक्षणातील परीक्षा सुधारांवर विचार करण्याची ही योग्य वेळ आहे. विकसित देशांमध्ये प्रकल्प, समस्यांवर आधारित शिक्षण व व्यावहारिक शिक्षणावर आधारित परीक्षा पद्धतीचा अवलंब केला जात आहे. उच्च शिक्षणातील परीक्षा पद्धतींमध्ये अद्ययावत तंत्रज्ञानाचा वापर करून त्याची अंमलबजावणी होणे आवश्यक आहे. कागदविरहित परीक्षा पद्धती, ऑनलाईन परीक्षा पद्धतीचा वापर करण्यासंदर्भात विचार झाला पाहिजे. शिक्षणशास्त्र अधिविभाग प्रमुख व परिसंवादाचे संयोजक डॉ. पी. एस. पाटणकर यांनी पाहुण्यांचे स्वागत केले. डॉ. सी. पी. सोनकांबळे यांनी प्रास्ताविक केले. डॉ. बी. पी. मरजे यांनी पाहुण्यांचा परिचय करून दिला. डॉ. जी. एस. पाटील यांनी आभार मानले. यावेळी सावित्रीबाई फुले, पुणे विद्यापीठातील शिक्षणशास्त्र अधिविभागातील डॉ. एम. एम. उपलाने, डॉ. एम. एस. पद्मिनी, डॉ. के. बी. पाटील, डॉ. पी. एस. कांबळे यांच्यासह विविध महाविद्यालयांतील प्राचार्य व शिक्षक उपस्थित होते.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
17 FEB 2017
लोकमत

**महेश काकडे :** विद्यापीठात परिसंवाद

# शिक्षकांना अद्ययावत ज्ञान असणे आवश्यक

कोल्हापूर : आजचे विद्यार्थी शिक्षणाबद्दल खूप जागरुक आहेत त्यांना सामोरे जाण्यासाठी शिक्षकांना अद्ययावत तंत्रज्ञानाचे ज्ञान असणे ही आवश्यक गरज बनली आहे, असे प्रतिपादन विद्यापीठाचे परीक्षा नियंत्रक महेश काकडे यांनी गुरुवारी केले.

शिवाजी विद्यापीठातील शिक्षणशास्त्र अधिविभाग परीक्षा विभाग यांच्यातर्फे मानव्यशास्त्र सभागृहात आयोजित 'उच्चशिक्षणातील परीक्षा सुधार' या विषयावरील दोनदिवसीय राष्ट्रीय परिसंवादाच्या उद्घाटनप्रसंगी ते बोलत होते. अध्यक्षस्थानी कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर होते.

काकडे म्हणाले, संशोधन केंद्रीत, संस्कार केंद्रीत समाज घडविण्याची जबाबदारी ही शिक्षकांवर आहे त्यासाठी शिक्षणपूरक व्यवस्था निर्माण झाली पाहिजे. चांगले शिक्षक विद्यार्थ्यांमध्ये सकारात्मक ऊर्जा प्रस्तुत करीत असतात. उच्चशिक्षणातील परीक्षा पद्धतीमध्ये संपूर्ण राज्यात एकसारखेपणा आणण्यासाठी एकत्रित प्रयत्न होणे आवश्यक आहे. परीक्षा प्रणालीमध्ये अद्ययावत तंत्रज्ञानाचा स्वीकार करण्यासाठी सर्व घटकांनी सकारात्मकता दर्शविली पाहिजे.

अध्यक्षीय भाषणात कुलसचिव डॉ. नांदवडेकर म्हणाले, उच्चशिक्षणातील परीक्षा सुधारांवर विचार करण्याची ही योग्य वेळ आहे. विकसित देशांमध्ये प्रकल्प, समस्यांवर आधारित शिक्षण तसेच व्यावहारिक शिक्षणावर आधारित परीक्षा पद्धतीचा अवलंब केला जात आहे. त्यासाठी विद्यार्थी ग्रंथालये, विषयतज्ज्ञांचे मार्गदर्शन घेत आहेत तसेच आवश्यकतेप्रमाणे उद्योग केंद्रांचीही मदत घेतात. उच्चशिक्षणातील परीक्षा पद्धतींमध्ये अद्ययावत तंत्रज्ञानाचा वापर करुन त्याची अंमलबजावणी होणे आवश्यक आहे. शिक्षणशास्त्र अधिविभाग प्रमुख डॉ. पी. एस. पाटणकर यांनी स्वागत केले. डॉ.सी. पी. सोनकांबळे यांनी प्रास्ताविक केले. डॉ. बी. पी. मरजे यांनी पाहुण्यांचा परिचय करुन दिला. डॉ. जी. एस. पाटील यांनी आभार मानले. यावेळी सावित्रीबाई फुले, पुणे विद्यापीठातील शिक्षणशास्त्र अधिविभागातील डॉ. एम. एम. उपलाने, डॉ. एम. एस. पद्मिनी, डॉ. के. बी. पाटील, डॉ. पी. एस. कांबळे यांच्यासह अनेक प्राचार्य, शिक्षक उपस्थित होते.

17 FEB 2017

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

लोकसत्ता

# 'मानवाने सारी बुद्धी शस्त्रास्त्रांच्या निर्मितीत वाया घालवली'

**प्रतिनिधी, कोल्हापूर**

**माकडापासून बुद्धिवान** मानव तयार झाला खरा, पण त्याने त्याची सारी बुद्धी शस्त्रास्त्रांच्या निर्मितीमध्येच वाया घालवली. मानवाची खरी ओळख ही युद्धात नाही, तर शांतीत आहे, असा संदेश मुकाभिनयाच्या माध्यमातून देऊन शिवाजी विद्यापीठ संघाने प्रेक्षकांची मने जिंकली.

विद्यापीठात सुरू असलेल्या ३२व्या अखिल भारतीय आंतरविद्यापीठ राष्ट्रीय युवा महोत्सवात आज सायंकाळी वि. स. खांडेकर भाषा भवन येथे 'माइम' अर्थात मुकाभिनयाच्या स्पर्धा झाल्या. विद्यार्थी-विद्यार्थिनी यांची तुडुंब गर्दी भाषा भवन सभागृहात झाली होती. विषयांचे वैविध्य हे या स्पर्धेचे वैशिष्ट्य ठरले. पाण्याचे महत्त्व व व्यवस्थापन, सीताहरण, ग्रेट अशोका, भारतीय सैन्य दल व सुरक्षा, सर्जिकल स्ट्राइक असे एकापेक्षा एक अनोखे विषय घेऊन विद्यार्थ्यांनी सादरीकरण केले. तत्पूर्वी, आज एकांकिका स्पर्धेचा उत्तरार्ध पार पडला. यामध्ये कोईमतूर, आसाम, नागपूर, आंध्र प्रदेश, मिदनापूर, थिरुअनंतपूरम, गुवाहाटी या ठिकाणच्या विद्यापीठांनी परकाया प्रवेश, दुष्यंत-शकुंतला, नातेसंबंध, आर्थिक घोटाळे, बदलते नातेसंबंध व सामाजिक वर्तणूक, मृच्छकटिकम्, आसामचा शूर पुरुष या विषयांवरच्या एकांकिका सादर केल्या. भारतीय गायन सत्रात भारतीय सुगम गायनाची स्पर्धा झाली. १५ विद्यापीठांच्या संघांनी येथे नॉन फिल्मी, गीज-गजल, भजन, शाबाद, अभंग आदी गीतप्रकार सादर करून उपस्थितांची वाहवा मिळवली.

सायंकाळी क्ले मॉडेलिंगच्या स्पर्धा झाल्या. यामध्ये बारा विद्यापीठांचे स्पर्धक सहभागी झाले. त्यांना 'संघर्ष' असा विषय देण्यात आला होता. विद्यार्थ्यांनी केवळ मानवाच्याच नव्हे, तर अगदी निसर्ग आणि पशुपक्ष्यांच्या जीवनातीलही रोजचा झगडा आपल्या शिल्पांतून आविष्कृत करण्याचा प्रयत्न केला

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
17 FEB 2017
तरुण भारत

# वेबकास्टिंगद्वारे आज निवडणुकीसंदर्भात मार्गदर्शन

**कोल्हापूर :** जिल्हा परिषद, पंचायत समितीच्या निवडणुकीसंदर्भात शुक्रवारी, १७ रोजी सांगली, सातारा, कोल्हापूर जिल्ह्यातील महाविद्यालयांना वेबकास्टिंगव्दारे जिल्हाधिकारी डॉ. अमित सैनी मार्गदर्शन करणार आहेत. सकाळी ९ वाजता सांगली व सातारा जिल्ह्यातील महाविद्यालयांना, तर कोल्हापूर जिल्ह्यातील महाविद्यालयांना सकाळी ११.१५ वाजता जिल्हाधिकारी डॉ. सैनी मार्गदर्शन करणार आहेत. www.cloud-india.com/live या संकेतस्थळावर प्रक्षेपण होणार आहे, हा कार्यक्रम सर्व महाविद्यालयांना एलसीडी स्क्रीनवर पाहावयास मिळणार आहे. विद्यापीठ परिक्षेत्रातील महाविद्यालयांनी शिक्षक, विद्यार्थी कर्मचाऱ्यांनी ऑनलाईन पाहिलेला कार्यक्रम फोटोसह zpelection2017@unishivaji.ac.in व affiliation.t2@unishivaji.in या ईमेलआयडीवर त्वरीत पाठवायचा आहे, असे पत्रक महाविद्यालय व विद्यापीठ विकास मंडळाच्या संचालकांनी दिले आहे.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
17 FEB 2017
पुढारी

# वेब कास्टिंगद्वारे विद्यापीठात आज मतदान जनजागृती

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

जिल्हा परिषद व पंचायत समितीच्या निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर मतदानाविषयी जागृती करण्यासाठी जिल्हाधिकारी डॉ. अमित सैनी हे वेबकास्टिंगद्वारे कोल्हापूर जिल्ह्यातील विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करणार आहेत.

जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुकीसंदर्भात जिल्हाधिकारी कार्यालयात आढावाबैठक झाली. यात विद्यापीठ कार्यक्षेत्रातील विद्यार्थ्यांमध्ये मतदान जागृती करण्याचा निर्णय झाला. त्यानुसार दि. १७ रोजी सकाळी ९ वाजता कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर हे वेबकास्टिंगने सांगली व सातारा जिल्ह्यांतील महाविद्यालयांना मार्गदर्शन करणार आहेत. विद्यापीठाशी संलग्न महाविद्यालयांसाठी वेबलिंक देण्यात आली आहे. मतदान जागृती अभियानाचे प्रेक्षपण विद्यार्थ्यांना दाखवावे, असे आवाहन बीसीयूडी संचालकांनी केले आहे.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
17 FEB 2017
तरुण भारत

## जिल्हाधिकाऱ्यांचे वेब कास्टिंगद्वारे मार्गदर्शन

कोल्हापूर : मतदानाविषयी जागृती करण्यासाठी आज, शुक्रवारी सकाळी ११ वाजल्यापासून जिल्हाधिकारी डॉ. अमित सैनी वेब कास्टिंगद्वारे मार्गदर्शन करणार आहेत, अशी माहिती महाविद्यालय व विद्यापीठ विकास मंडळाने दिली आहे. या प्रक्षेपणासाठी विद्यापीठाच्या सर्व संलग्न महाविद्यालयांनी इंटरनेट सुविधेसह अद्ययावत संगणक व एलसीडी उपलब्ध करून घेणे आवश्यक आहे. कोल्हापूर जिल्ह्यातील महाविद्यालयांत सकाळी ११.१५ वाजता kwww.cloud-india.com/livel या वेबलिंकचा वापर करून हे प्रक्षेपण होणार आहे.

17 FEB 2017

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

Times of India

# 3-day books festival to begin at SUK on Feb 23

TIMES NEWS NETWORK

**Kolhapur:** The Shivaji University, Kolhapur (SUK) will be organising its 11th Granth Mahotsav (books festival) on the university campus from February 23 to 25, a university official said.

The event has been organised on the occasion of the university's 53rd convocation ceremony, for which over 50,000 people, including students, are expected to attend. Around 50 book stalls will be set up.

"The three-day book festival which will be inaugurated on Thursday, will see participation of book publishers from across the region," added the official.

"The event, previous year, had over 50 stalls of different book publishers, including competitive book publishers, social, intellectual and other literary works of various authors. Back then, many of the publishers had offered a discount of 20-30% on the books," said the official.

Another SUK official said that they are hoping for a better response for the Teachers Personal Library Scheme (TPLS). "The TPLS scheme offers 50% discount to teaching as well as non-teaching faculties for buying books. Under the scheme along with teachers, class one, two and three officers of the university and affiliated colleges are allowed 50% grant on the purchasing of books," he said.

The budgetary provision was earlier restricted to Rs 1.5 lakh for the TPLS scheme, but was doubled to Rs 3 lakh in the year 2012-13. Under the scheme, teachers can buy books with respect to their field of expertise.

The 25-year-old scheme, according to university officials, is valid twice a year where a teacher or an officer has to submit an application form for the grant.

"However, so far, the response has been low," added the official.

File Photo



Over 50,000 visitors are expected to attend the exhibition of books

17 FEB 2017

पुढारी

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# कबड्डी स्पर्धेत विद्यापीठ तंत्रज्ञान अधिविभाग संघ अजिंक्य

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

शिवाजी विद्यापीठ अंतर्गत अग्रणी महाविद्यालयीन कबड्डी स्पर्धेत अंतिम सामन्यात विद्यापीठातील तंत्रज्ञान अधिविभाग संघाने संत गजानन महाराज कॉलेज ऑफ इंजिनीअरिंग, गडहिंग्लज संघावर २०-१८ अशा फरकाने अजिंक्यपद पटकाविले.

कबड्डी स्पर्धेत नाणेफेक जिंकून तंत्रज्ञान अधिविभागाच्या संघाने प्रथम चढाई करण्याचा निर्णय घेतला. मध्यंतरापर्यंत अधिविभाग संघाने ७ गुणांची बढत घेतली. मध्यांतरानंतर १३-६ अशी गुणसंख्या होती. प्रत्युत्तरादाखल खेळताना विद्यापीठ तंत्रज्ञान अधिविभाग संघाने २ गुणांची बढत घेऊन विजय संपादन केला. संघातील अजय राठोड (कर्णधार), अजित काळे, अभिजित खाडे, ओमकार घडसिंग, आशिष मगदूम, शुभम माळी, आदित्य कोळेकर, अर्जुन काळे, ओंकार हेबाळे, ओमकार मोरे, संदीप माळी आणि मयूर कुदाळे या खेळाडूंनी विजय मिळवून दिला. तंत्रज्ञान अधिविभागाचे संचालक डॉ. जयदीप बागी आणि एस. एम. लोखंडे यांचे यांच्या हस्ते विजेत्या खेळाडूंचा सत्कार करण्यात आला.



**कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठ तंत्रज्ञान विभागाच्या विजेत्या कबड्डी संघाचा सत्कार करताना संचालक डॉ. जयदीप बागी आणि एस. एम. लोखंडे आदी.**

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
17 FEB 2017
पुण्यनगरी

# तंत्रज्ञान अधिविभाग संघ कबड्डीत अजिंक्य

**कोल्हापूर / प्रतिनिधी :**

शिवाजी विद्यापीठ अंतर्गत अग्रणी महाविद्यालयीन कबड्डी स्पर्धेत अंतिम सामन्यात विद्यापीठातील तंत्रज्ञान अधिविभाग संघाने संत गजानन महाराज कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग, गडहिंग्लज संघावर २०-१८ अशा फरकाने मात करीत अजिंक्यपद पटकाविले.

नाणेफेक जिंकून तंत्रज्ञान अधिविभागाच्या संघाने प्रथम चढाई करण्याचा निर्णय घेतला. मध्यंतरापर्यंत अधिविभाग संघाने ७ गुणांची आघाडी घेतली. मध्यंतरानंतर १३-६ अशी गुणसंख्या होती. प्रत्युत्तरादाखल खेळताना तंत्रज्ञान अधिविभाग संघाने २ गुणांची आघाडी घेअन विजय मिळवला. यामध्ये अजय राठोड (कर्णधार), अजित काळे, अभिजित खाडे, ओमकार घडसिंग, आशीष मगदूम, शुभम माळी, आदित्य कोळेकर, अर्जुन काळे, ओंकार हेबाळे, ओमकार मोरे, संदीप माळी आणि मयूर कुदाळे या खेळाडूंनी चिवट झुंज देऊन विजय मिळवला. तंत्रज्ञान अधिविभागाचे संचालक डॉ. जयदीप बागी आणि एस. एम. लोखंडे यांचे सहकार्य लाभले.